१२३

क्रमांक कॉन/एल् • आर • १२

पुणे, दिनांक २९/७/७४

परिपत्रक
------

विषय :- मुंबईचा तुकडे प्रतिबंधक व ज • ए का • १९४७
कोर्टवाटप प्रकरणी गट विभाजना बाबत

गांवची जमीन एकत्रीकरण योजना कार्यान्वित झाल्यानंतर कोर्टवाटप प्रकरणी मोजणी करताना व वाटपाचे प्रस्ताव तयार करताना या कार्यालयाकडे येणाऱ्या बऱ्याचशा प्रकरणा वरून खालील गोष्टी दुर्लक्षिलेल्या दिसतात •

१) गांवास लागू असलेले प्रमाणभूत क्षेत्र संबंधी भूमापकांना माहित नसते, अथवा जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडून कळविले जात नाही •

२) एकत्रीकरण योजनेचे गांवी काम सुरू असले किंवा ते पूर्ण झाले असले तरीही एकत्रीकरणापूर्वी असलेल्या भूमि अभिलेखाप्रमाणे वाटपाचे काम केले जाते • ज्या गांवी एकत्रीकरणाचे काम सुरू आहे अगर पूर्ण झाले आहे त्या गांवात वाटपाचे काम एकत्रीकरण योजनेस अनुसरून करणे जरूर आहे •

३) गांवची योजना कार्यान्वित झाली आहे अगर कसे? असल्यास केव्हां (तारीख) याची खात्री करून केली जात नाही व गांवी योजनेचे काम चालू असल्यास सदर गांवचे वाटप कामाचे आदेश सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे निदर्शनास आणून वाटप काम एकत्रीकरण योजना पूर्ण होईपर्यंत स्थगित ठेवले जात नाही •

४) कोर्ट हुकूमनाम्यात मूळचे स • नं • हि • नं • नमूद केलेले असले तरी त्या जमिनी योजनेत कायम ठेवल्या आहेत की, बदलल्या आहेत या बाबत एकत्रीकरण तक्त्यावरून खात्री केली जात नाही • तसेच योजनेत जमिनी बदलल्या असल्यास योजना कार्यान्वित झाल्याचे कोर्टाचे निदर्शनास आणून हुकूमनाम्यात गट नंबर दाखल करून घेण्याची पध्दती अवलंबिली जात नाही •

५) वाटप तक्ता मोजणीचा नकाशा व तदानुषंगिक सर्व कागदपत्र गटाप्रमाणे तयार करण्यात येत नाहीत •

६) विशेषतः एकत्रीकरण झालेल्या गांवी वाटप करताना शक्यतो अखंड गटांत वाटप अशक्य झाल्यास विभाजनांत होणाऱ्या उपगटांचे क्षेत्र महसूल व वन विभागाकडील ठराव क्र • कॉन/११६१-४२२७२-ब्दी दिनांक २९-९-६५ मधील अटीस अनुसरून म्हणजे प्रमाणभूत क्षेत्राच्या दुपटीपेक्षा कमी रहात नाही हे पाहिले जात नाही व तसे अशक्य दिसल्यास का • क • ८ अ अ प्रमाणे फेरवाटप सुचविले जात नाही •

२/-

वरील उणीवामुळे सदरची प्रकरणे शकपूर्ततेसाठी अथवा वाटपाचा अन्य पर्याय पाहण्यासाठी परत पाठवावी लागतात, व परिणामी अशी गट विभाजनाची प्रकरणे परवानगी मिळण्यामध्ये प्रलंबित होतात. वास्तविक कोर्टवाटप प्रकरण प्राप्त होताच गावची योजना कार्यान्वित झाली आहे अगर कसे याची तारखेसह माहिती घेवून एकत्रीकरण तक्त्याचा गटांच्या नकाशाचा उतारा प्राप्त करून घेवून जमीन कायम आहे/ बदलली आहे याची खात्री करून घेणे जरूर आहे.

वाटपाचे कामी अखंड गटात शक्यतो वाटप करणेची धारणा ठेवून ते जेथे अशक्य असेल तेथे मोजणी करताना नकाशा गटाचा आहे हे ध्यानी घेवून मोजणी केल्यास विभाजनाचे क्षेत्र, तदनुषंगिक सर्व कागदपत्र गटप्रमाणे आपोआप तयार होतात. तसेच वरील निर्देशिलेल्या शासनाच्या दि. २९-९-६५ मधील आदेशानुसार विभाजनाने होणारे प्रत्येक उपगटाचे क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्राच्या दुपटीपेक्षा कमी होते अगर कसे याची जागेवरच खात्री करता येते व तसे होत असल्यास दुसरा अन्य पर्याय अथवा का. क. ८ अ अ प्रमाणे कार्यवाही करावयाची या संबंधी स्पष्ट कल्पना येवून त्या बाबत कोर्टाकडून व जिल्हाधिकारी यांचेकडून स्पष्ट आदेश घेणे जरूरीचे आहे. गट विभाजनाची प्रकरणे प्राप्त झाल्यापासून त्या कामी ३ महिन्यात योग्य ती कार्यवाही करण्याबद्दल शासनाच्या महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्रमांक एल आर क्यू सी ओ एन. ११६९-२७०७२७-व दिनांक २१-१-७० व २०-५-७४ ने आदेश दिलेले असल्याने प्रकरणांची पूर्तता तातडीने केली जाईल याकडे लक्ष द्यावे.

स्थळप्रतीवर जमाबंदी आयुक्त आणि
संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांची स्वाक्षरी असे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख(म.रा.) पुणे
यांचेकरिता.

प्रतिलिपी :- जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख (सर्व)/अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व) उपसंचालक, भूमि अभिलेख (सर्व) व एकत्रीकरण अधिकारी(सर्व) यांजकडे माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.